**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 01.10.2025** **वार- बुधवार**

---

**<u>प्रतापराव जाधव</u>**

आयुष मंत्रालयाच्या वतीने पुण्यात नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी संस्थेमध्ये गांधी जयंती निमित्त उद्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी केंद्रीय आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते 'महात्मा गांधी वेबथॉन' या पुस्तिकाचे प्रकाशन होणार आहे.

**<u>मराठी भाषा दिवस</u>**

पिंपरी चिंचवड महापालिका, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, आणि महापालिकेच्या भैरवनाथ आणि हुतात्मा चाफेकर सार्वजनिक ग्रंथालयांच्या संयुक्त विद्यमाने 3 ऑक्टोबरला अभिजात मराठी भाषा दिवस आणि 3 ते 9 ऑक्टोबर अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा केला जाणार आहे. या काळात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली आहे.

**<u>आयुक्त किशोर</u>**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानं पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी येरवडा ते कात्रज हा 20 किलोमीटर लांबीच्या बोगद्याचा प्रकल्प प्रस्तावित केला होता. हा प्रकल्प व्यवहार्य नसून, खर्चाच्या दृष्टीनं देखील परवडणारा नसल्याचं महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी काल सांगितलं. पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरणा'च्या अलीकडेच झालेल्या  बैठकीत या प्रकल्पावर चर्चा झाली होती.

**वंदना चव्हाण**

राज्य सरकारनं लागू केलेल्या एकीकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाच्या तरतुदीमुळे पुणे शहरात उंच इमारती उभ्या राहणार आहेत. यामुळे नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सोयीसुविधांवरचा भार वाढणार आहे. या नियमावलीत बदल करावा, अशी मागणी राज्य सरकारकडे करावी, अशी विनंती चव्हाण यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना एका निवेदानाद्वारे केली आहे.

**यशदा**

आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत माहिती अधिकार विषयक प्रशिक्षण कार्यक्रम झाला. प्रशासकीय कारभार अधिक लोकाभिमुख आणि पारदर्शक राहण्यासाठी नागरिकांना माहिती खुली करणे आवश्यक असल्याचं यशदाचे संशोधन अधिकारी आणि प्रशिक्षक दादू बुळे यांनी सांगितलं. माहिती अधिकार कायद्यानुसार 30 दिवसांत माहिती न मिळाल्यास अपील करता येत असून दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर दंडाची तरतूद असल्याचंही त्यांनी यावेळी नमूद केलं.

**स्वस्थ नारी, सशक्त परिवार**

शासनाच्या स्वस्थ नारी, सशक्त परिवार या राष्ट्रीय अभियानाअंतर्गत पुण्यातील विभागीय आयुक्त कार्यालयातील महिला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आलं होतं. या शिबिरात विभागीय एकंदर 235 महिला अधिकारी आणि  कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली.

**शेतकरी ओळखपत्र गैरवापर**

केंद्र सरकारच्या ॲग्रीस्टॅक योजनेतर्गत शेतकऱ्यांना डिजिटल ओळखपत्र देण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, काही ठिकाणी अनधिकृतपणे ऑफलाइन ओळखपत्रे वाटप होत असल्याचा कृषी आयुक्तालयाने इशारा दिला आहे. शेतकऱ्यांनी फसवणूकीपासून

सावध राहून केवळ अधिकृत संकेतस्थळांवरूनच नोंदणी करावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**खेळ रंगला उपक्रम**

वारकरी परंपरेला आणि संस्कृतीला अभिवादन म्हणून महाराष्ट्रात प्रथमच खेळ रंगला वारकऱ्यांचा' हा अभिनव आणि भक्तिमय उपक्रम काल पुण्यात साजरा करण्यात आला. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून हजारों वारकरी, कीर्तनकार आणि प्रवचनकार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते मिलिंद वाळंज, यांनी दिली.

**शालेय पाटीपूजन**

साईनाथ मंडळ ट्रस्टच्या वतीनं शालेय विद्यार्थ्यांसाठी पाटीपूजनाचा कार्यक्रम आज पुण्यात शिरडीतील न्यायमूर्ती रानडे बालक मंदिर सभागृहात झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होऊन देवी सरस्वतीच्या पूजनातून संस्कृती आणि शिक्षणाचा सन्मान केला.

**ज्येष्ठ नागरिक दिन**

“ज्येष्ठ नागरिक दिन” कार्यक्रमा अंतर्गत दोन पिढ्यांमध्ये सुसंवाद साधण्यासाठी समाजकल्याण पुणे विभागामार्फत येत्या 6 ऑक्टोबरला दुपारी 11 ते 2 वाजेपर्यंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, येरवडा इथं ज्येष्ठ नागरिक आणि युवक यांच्या मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिर देखील आयोजित करण्यात आलं आहे. पुणे जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नागरिक आणि संबंधित संघटनांना उपस्थित राहण्याचं आवाहन पुण्याच्या समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केलं आहे.

**बाजार बंद**

'विजयादशमीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे येत्या शुक्रवारी पुण्यातील मार्केटयार्ड इथल्या मुख्यबाजार आवारातील फुलांचा बाजार, केळी बाजार आणि मोशी उपबाजार बंद

राहणार आहेत त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्रीस आणू नये असं कृषी उत्पन्न बाजार समितीनं सांगितलं आहे. फळे आणि भाजीपाला विभाग, पान बाजार आणि अन्य उपबाजार नियमितपणे सुरू राहणार आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज  सकाळ पासून आकाश ढगाळ असून कमाल तापमान 29 तर किमान तापमान 19 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं आहे. उद्याही यांच स्वरूपाचं तापमान राहण्याचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**